दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990
लातूर वर्ष ४ थे अंक ९१ वा रविवार दि.०८ सप्टेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## अजित पवारांना महायुतीत घेणे काळाची गरज

मुंबई : प्रतिनिधी अजित पवारांना महायुतीत घेऊन चूक झाली असे म्हणणार नाही. ती काळाची गरज होती. काळाची गरज असताना संधी प्राप्त होत असेल तर ती सोडायची नसते. एका मराठी वृत्तवाहिनीला मुलाखत देताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवारांबाबत भाष्य केले आहे. तसेच त्यांनी अनेक राजकीय मुद्यांवर भाष्य केले आहे.



दरम्यान, राज्यात दोन वर्षांपूर्वी सत्तांतर झाले. शिवसेनेतून एकनाथ शिंदे आणि त्यांचे सहकारी आमदार भाजपसोबत सत्तेत आले. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले. त्यानंतर काहीच महिन्यांत अजित पवार हे आपल्या सहकारी आमदारांसह महायुतीमध्ये सामील झाले. अजित पवार हे महायुतीच्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री झाले. दरम्यान लोकसभा निवडणुकीनंतर अजित पवारांनी आपल्या कामकाजामध्ये बदल केल्याचे म्हटले जात आहे. पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवार यांना आमचे काही गुण लागणारच असे वक्तव्य केले. या त्यांच्या वक्तव्याची राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा रंगली आहे. अजित पवार महायुतीत आल्याने वाद निर्माण झाल्याचे म्हटले जात आहे. अजित पवार हे गुलाबी झाले आणि भगवे झाले नाहीत यावरून फडणवीसांना प्रश्न विचारण्यात आला.

यावर बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, अजित पवार सर्व आमदारांना सिद्धिविनायकाच्या दर्शनाला घेऊन गेले. गेली ४० वर्षे राजकारणात आहेत. त्यांना कधी असे पाहिले आहे का? अजित पवारांना महायुतीत घेऊन चूक झाली असे म्हणणार नाही. ती काळाची गरज होती. काळाची गरज असताना संधी प्राप्त होत असेल तर ती सोडायची नसते.

फडणवीस म्हणाले, अजित पवारांना महायुतीतून वगळणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. आम्ही सर्व एकत्रित आहोत. सोबत राहणार आहोत. लोकसभेला असलेली महायुती विधानसभेला देखील कायम असणार आहे. प्रत्येकाला वाटत असते की, आपला पक्ष मोठा व्हावा. अजित पवार सर्व आमदारांना सिद्धिविनायकाच्या दर्शनाला घेऊन गेले. गेली ४० वर्षे राजकारणात आहेत. त्यांना कधी असे पाहिले आहे का? त्यांना आमचे काही गुण लागणारच ना. त्यामुळे काळजी करण्याचे काही कारण नाही. एखाद्या गोष्टीत चूक झाली तर माफी मागणे ही संवेदनशीलता आहे. चूक होऊन देखील माफी न मागणे ही तानाशाही आहे. माफी मागून माणूस लहान होत नाही. अशा काही गोष्टी घडल्या तर माफी मागायला मागेपुढे बघणार नाही.

## मी कोठून निवडणूक लढवणार हे पक्षश्रेष्ठी ठरवतील

कंधार : प्रतिनिधी भारतीय जनता पार्टी सोडणार अशा बावड्या उठवल्या जात आहेत मी तसे कधी कुठे म्हटलं नाही अफवांवर विश्वास ठेऊ नका माझ्या हातात लोकसभा व विधानसभा निवडणूक लढवायचं नाही. पक्षश्रेष्ठी जो निर्णय घेईल, तो निर्णय मान्य करु, अस मी ठरवलं आहे. लोहा विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवावी, अशी मागणी माझ्या कार्यकर्त्यांकडून होत आहे. शेवटी कार्यकर्ता म्हणून नेतृत्वाच्या बाहेर जाता येत नाही असे माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले. कंधार येथील संपर्क कार्यालयात दि २ रोजी मंगळवारी कंधार दौऱ्यावर आले असता पत्रकारांशी संवाद साधला यावेळी भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य बाबुराव केंद्रे, भाजपाचे तालुकाध्यक्ष किशनराव डफडे, भाजपाचे तालुका सरचिटणीस मधुकर डांगे उपस्थित होते.




पुढे बोलताना माजी खा. चिखलीकर म्हणाले की, लोकसभा निवडणूकीत मी पराभूत झालो असलो तरी सिडको भागातून मला खूप मतदान मिळाले आहे. त्यामुळे मला तिथल्या लोकांनी नांदेड दक्षिण मधून विधानसभा लढावी असे वाटते हा माझ्या सारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा सन्मान आहे. कंधार लोहा विधानसभा मतदारसंघातील कार्यकर्त्यांची इच्छा कंधार –लोहा विधानसभा निवडणूक लढवावी. नांदेड जिल्ह्यातील कार्यकर्ते म्हणतात की नांदेड लोकसभेची जागा रिक्त झाल्याने लढवावी. परंतु माझ्या हातात लोकसभा व विधानसभा निवडणूक लढवायचं नाही. पक्षश्रेष्ठी जो निर्णय घेईल, तो निर्णय मान्य करु, अस मी ठरवलं आहे. मी भाजप पक्षात आहे. सध्या तरी भाजप पक्ष सोडण्याचा विचार नाही. मी काँग्रेस पक्षात जाणार असे कुठेही बोललो नाही असे त्यांनी सांगितले.

यावेळी बोलताना माजी खा. चिखलीकर लोकसभा म्हणाले की, निवडणूकीत मी पराभूत झालो सिडको भागातून असलो तरी मतदान मिळाले आहे तिथल्या लोकांना दक्षिण मधून विधानसभा लढवावी असे वाटते. हा माझ्या सारख्या सामान्य कार्यकर्त्याचा सन्मान आहे. कोणी म्हणत आहे की मी तसेच पुढे बोलताना माजी खा. चिखलीकर म्हणाले की, नांदेड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली आहे. शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. मी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची भेट घेऊन निवेदन दिले आहे. गेल्या तीन ते चार दिवसांपासून पावसाची संततधार सुरू आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे पिक पावसाने खरडून नेले आहे. त्यामुळे शेती पिकाचे तात्काळ पंचनामे करुन तातडीने मदत करावी अशी मागणी केली आहे. शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी मोठ्या प्रमाणात भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## ९ लाखांहून जास्त रेडिओ स्रोतांचा शोध, पुण्याच्या शास्त्रज्ञांना यश!

पुणे : वृत्तसंस्था दक्षिण आफ्रिकेतील 'मीरकॅट रेडिओ' दुर्बिणीच्या साहाय्याने केलेल्या निरीक्षणातून आंतरराष्ट्रीय पातळीवरील खगोलशास्त्रज्ञांना तब्बल ९ लाख ७१ हजार १८० रेडिओ स्रोतांचा शोध लागला आहे. यानिमित्ताने पहिल्यांदाच शास्त्रज्ञांना एकाच रेडिओ अवकाश सर्वेक्षणातून जवळपास १० लाख स्रोत हाती लागले आहेत. या शोधात पुण्यातील आंतरविद्यापीठीय खगोलशास्त्र आणि खगोलभौतिकी केंद्रातील (आयुका) शास्त्रज्ञांचा सहभाग आहे. मिरकॅट रेडिओ दुर्बिणीच्या साहाय्याने अवकाशातील रेडिओ स्रोतांची माहिती संकलित करून त्यांचा स्वतंत्र कॅटलॉग तयार करण्यात आला आहे. यानिमित्ताने 'मीरकॅट'च्या साहाय्याने केलेल्या सर्वेक्षणाद्वारे नोंदविलेल्या स्रोतांचा आतापर्यंतचा सर्वात मोठा 'कॅटलॉग' तयार झाला आहे. दशलक्ष किंवा त्याहून जास्त स्रोत असलेल्या मूठभर रेडिओ कॅटलॉगपैकी हा एक कॅटलॉग असणार आहे. 'मीरकॅट रेडिओ दुर्बिणीच्या साहाय्याने मिळालेल्या असंख्य सखोल प्रतिमांसह कच्च्या स्वरूपातील माहिती संकलित करून ठेवण्यासाठी अत्याधुनिक मांडणी आयुकामध्ये कार्यान्वित करण्यात आली आहे. दुर्बिणीच्या साहाय्याने संकलित झालेल्या प्रतिमा आणि कॅटलॉगचे विश्लेषण आणि त्यातील संशोधन नागरिकांसमोर आणण्याचे काम जर्मनीमधील मॅक्स प्लँक इन्स्टिट्यूट फॉर रेडिओ अॅस्ट्रॉनॉमी (एमपीआयएफआर) येथे केले जात आहे.




## शासनाच्या निषेधार्थ कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांचा एल्गार

कंधार : प्रतिनिधी आपल्या प्रलंबित मागण्यासाठी गेल्या अनेक वर्षापासून शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांनी मागण्याची पूर्तता होत नसल्याने गुरुवारी शिक्षक दिनावर बहिष्कार टाकला. या वेळी महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाच्यावतीने तहसीलदारांच्या माध्यमातून शिक्षणमंत्र्यांना निवेदन देण्यात आले. राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या समस्या सोडविल्या जात नसल्याने व त्याबाबत वारंवार आश्वासन देऊनही शासन आश्र्वासित मागण्यांवर निर्णयाची अंमलबजावणी करीत नसल्याने राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाने गुरुवारी राज्यभर शिक्षक दिनावर बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला होता. त्या अनुषंगाने कंधार मध्ये गुरुवारी कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांनी शिक्षक दिनावर बहिष्कार टाकून शिक्षक 'अन्याय दिन' साजरा केला. मागच्यावर्षी प्रलंबित मागण्या पैकी काही मागण्या मान्य करण्याचे लेखी आश्वासन सरकारने दिले होते. त्यामुळे बारावीच्या उत्तर पत्रिका तपासणी वरील बहिष्कार महासंघाने मागे घेतला होता. त्यानंतर मान्य मण्यामधील १२९८ वाढीव पदांना मान्यता देण्याऐवजी सदर पदावर कार्यरत २८३ शिक्षकांच्या समावेशनाचा आदेश काढण्यात आला. व राज्यात काही शिक्षकांचे समायोजन करण्यात आले. परंतू अनेकांचे समायोजन रखडले. अनेक शिक्षकांना त्यांच्या जिल्ह्यात व विभागात रिक्त जागा असूनही त्यांच्या समयोजनेचे अधिकार संबंधित उपसंचालकांना देण्याचे कबूल करूनही त्याबाबतचे आदेश निघालेले नाहीत. अशी अनेक प्रकरणे आश्वासन देऊन निकाली काढली गेली नसल्याने शिक्षकांच्या मनात असंतोष निर्माण झाला असून शिक्षक दिनावर बहिष्कार टाकून शिक्षक दिन अन्याय दिन म्हणून साजरा केला. यावेळी महासंघाच्यावतीने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

## लाखाच्या वर गरजूपर्यंत पोहोचला 'भाऊचा डब्बा'

कंधार : प्रतिनिधी रुग्ण, त्यांचे नातेवाईक व गरजूंना भाऊच्या डब्याच्या माध्मातून सेवा करण्याची संधी उपलब्ध करून देणे, हे मी माझे भाग्य समजतो. सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेऊन सुरू करण्यात आलेला 'भाऊचा डब्बा ' हा उपक्रम असाच अविरतपणे सुरू राहील. मागील तीन वर्षांपासून यात खंड पडला नाही. पुढेही पडणार नाही. शेवटच्या श्वासा पर्यंत भाऊच्या डब्याच्या माध्यमातून रुग्णांना बरोबरच गोरगरीब, उपेक्षितांची सेवा करणार, असा निर्धार भाऊच्या डब्याचे संकल्पक प्रा. डॉ. पुरुषोत्तम धोंडगे यांनी व्यक्त केला. भाऊचा डब्बा या उपक्रमाने नुकताच बाराशे दिवसाचा पल्ला ओलांडला. जेष्ठ स्वतंत्र सेनानी, शिक्षणमहर्षी, माजी खासदार व माजी आमदार दिवंगत डॉ. केशवराव धोंडगे यांच्या शतकोत्सवी वाढदिवसाचे औचित्य साधून श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटीच्यावतीने दि. १ मे २०२१ पासून कोरोना रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी भाऊचा डब्बा हा स्तुत्य उपक्रम सुरू करण्यात आला. या उपक्रमाने १२०० दिवसाचा पल्ला ओलांडला आहे. दिवंगत भाई डॉ. केशवराव धोंडगे यांनी नाहिरेवाल्यांसाठी आपले संपूर्ण आयुष्य झिजविले. त्यांना न्याय मिळवून दिला. मन्याडखोऱ्यात शैक्षणिक दालने उघडून तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षणाची गंगा नेली. उपेक्षित, शोषित समाज त्यांचा केंद्रबिंदू होता. त्यांचे विचार आजच्या काळाला दिशा देणारे आहेत. त्यांनी कधीच तत्वांशी तडजोड केली नाही. त्यांचा वसा पुढे चालविण्याचा आम्ही प्रयत्न करीत असून रुग्ण सेवा त्याचाच एक भाग असल्याचे प्रा. डॉ. पुरुषोत्तम धोंडगे यांनी यावेळी सांगितले. माजी खासदार व माजी आमदार दिवंगत डॉ.भाई केशवराव धोंडगे यांनी आपल्या हयातीत गोरगरीब जनतेच्या कल्याणासाठी व हितासाठी अहोरात्र प्रयत्न करुन त्यांना न्याय मिळवून देण्याचे काम केले होते. त्यांचाच वारसा पुढे चालू ठेवण्याचे कार्य त्यांचे सुपुत्र पुरुषोत्तम धोंडगे करीत असून त्यांनी गोरगरीब जनतेसाठी भाऊचा डब्बा या नावाने अन्नदानाचा उपक्रम चालू केला आहे.



## राज्यातील जनतेला सुख, समृद्धी मिळू दे!

मुंबई : गणेशोत्सवानिमित्त आज 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सपत्नीक गणरायाची विधिवत पूजा करुन प्रतिष्ठापना केली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी राज्यातील जनतेला सुख समृद्धी मिळू दे अशी प्रार्थना केली. दरवर्षीप्रमाणे यंदाही मुख्यमंत्र्यांच्या 'वर्षा' निवासस्थानी गणरायाचे आगमन झाले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी राज्यातील जनतेला गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की गणरायाचे आगमन झालंय. आपल्या आयुष्यात पण आनंद, समाधान, समृद्धी येवो, सर्वांना सुबुद्धी मिळो हीच प्रार्थना. प्रत्येक गणोशोत्सव एक नवी ऊर्जा, प्रेरणा आणि उत्साह घेऊन येतो. सगळीकडे मंगलमय आणि पवित्र वातावरण निर्माण होते. गणेशोत्सवातून महाराष्ट्राच्या महान संस्कृतीचे दर्शन घडते. सगळ्या जगाचे महाराष्ट्राकडे लक्ष लागलेले असते. या काळात महाराष्ट्राच्याच नाही तर देशात आणि विदेशातही मराठी माणसांत उत्साह–जोश दिसतो.

हे शेतक–यांचे, कष्टक–यांचे सरकार आहे. यंदा राज्यात सगळीकडे खूप चांगला पाऊसही झाला आहे, त्यामुळं शेतकरी बांधवामध्येही उत्साह आहे. काही ठिकाणी अतिवृष्टीमुळे नुकसान झाले आहे. पण सरकार पूर्णपणे शेतक–यांच्या पाठीशी आहे. त्यामुळे शेतक–यांना सगळी मदत केली जाईल असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. तसेच, गणेशाची मनोभावे सेवा करतानाच, आपण सामाजिक बांधिलकची जाणीव ठेवूया. गरजू लोकांना मदतीचा हात द्या. आपण पर्यावरणाची काळजी घेणे पण गरजेचे आहे. आपले सणवार हे निसर्गाला पूरक असे असतात. त्यामुळे निसर्गाचे जतन–संवर्धन होईल, ही बाब लक्षात घेऊन सण साजरे करावेत असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे.

राज्य शासनाने अनेक चांगल्या सामाजिक योजना सुरु केल्या आहेत, देशपातळीवर त्याचे कौतुक होते आहे. शेतकरी युवक महिला सर्वच स्तरातील घटकांचा विचार करून शासन सगळ्यांना सक्षम करण्यासाठी पाठबळ देत आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण सारखी योजना म्हणजे राज्यातल्या भगिनींच्या आयुष्यात क्रांती आणणारी योजना ठरत आहे. या बहिणींचे आशीर्वादही आम्हाला मिळत आहेत. परदेशी गुंतवणूक राज्यात मोठ्या प्रमाणावर येत आहे. देशाच्या पाच ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्थेत महाराष्ट्राचा एक ट्रिलियन डॉलर्सचा वाटा असणार आहे असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

## काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर कर्तव्यदश रेल्वेची विनेशला कारणे दाखवा नोटीस

नवी दिल्ली : भारताची कुस्तीपटू विनेश फोगाट गेल्या काही दिवसांपासून सातत्याने चर्चेत आहे. नुकतेच गेल्या आठवड्यात तिचे पदक थोडक्यात हुकले होते. त्यानंतर तिने कुस्तीतून निवृत्तीही घेतली. आता दोनदिवसांपूर्वीच तिने राजकारणाच्या आखाड्यात प्रवेश केला आहे. तिने कुस्तीपटू बजरंग पुनियासह काँग्रेस पक्षात प्रवेश केला. त्यानंतर लगेचच तिला हिमाचल प्रदेशातून काँग्रेसने आगामी विधानसभेसाठी उमेदवारीही दिली. अशातच आता असे समोर आले आहे की रेल्वेकडून विनेशला कारण दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. याबाबत उत्तर रेल्वेच्या अधिका–यांकडून पुष्टी करण्यात आली आहे. विनेश रेल्वेमध्ये नोकरीला होती. उत्तर रेल्वेच्या अधिका–याने दिलेल्या माहितीनुसार ४ सप्टेंबर २०२४ रोजी तिला ही कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांपासूनच विनेश काँग्रेस पक्षात प्रवेश करणार असल्याची चर्चा होती. तिने राहुल गांधी यांची भेटही घेतली होती. अधिका–याने पुढे सांगितले की ती सरकारी कर्मचारी असल्याने ती राजकीय पक्षात सामील होणे हा सेवा नियमांचे उल्लंघन आहे, त्यामुळे तिला तिची भूमिका स्पष्ट करण्यास सांगण्यात आले आहे. तथापि काँग्रेस नेते केसी वेणुगोपाल यांनी शुक्रवारी आरोप केला की विनेशने रेल्वेचा राजीनामा दिल्यानंतर त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. मात्र रेल्वेचे सीपीआरओ हिमांशू उपाध्याय यांनी हा आरोप फेटाळला आहे. उपाध्याय यांनी सांगितले की तिने राजीनामा देण्यापूर्वीच तिला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. हरियाणा विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसकडून ३१ उमेदवारांची यादी जाहीर शुक्रवारी जाहीर केली. यामध्ये विनेश फोगाटला काँग्रेसने जुलाना विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.



## संपादकीय....

# केवळ कठोर कायदे काय कामाचे?

अपराजिता विधेयक आणण्यामागे महिलांच्या सुरक्षिततेचा हेतू आणि राजकीय खेळीही खेळण्याचा ममता यांचा इरादा लपलेला नाही. तेव्हा या विधेयकाची दखल या दोन्ही अंगांनी घेणे आवश्यक. महिलांवर अत्याचार करणार्यांना थेट फाशीची शिक्षा देण्याची तरतूद करणारे अपराजिता विधेयक पश्चिम बंगाल विधानसभेने एकमताने नुकतेच संमत केले. कोलकाता येथील आरजी कर वैद्यकीय महाविद्यालयात ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीस एका ३१ वर्षीय प्रशिक्षणार्थी महिला डॉक्टरवर एका नराधमाने बलात्कार करून तिचा खून केला होता. त्या घटनेनंतर देशभर संतापाची लाट उसळली होती. त्यामुळे काही तरी ठोस कारवाई करणे त्यांच्या दृष्टीने निकडीचे बनले होते. आता संमत झालेले अपराजिता विधेयक हे त्याचाच एक भाग. देशभरात नुकत्याच भारत न्याय संहिता आणि भारत नागरिक सुरक्षा संहिता लागू झाल्या आहेत. तथापि महिला अत्याचारांतील दोषींना अधिक कठोर शिक्षेची तरतूद करणारे विधेयक ममता यांनी आणले. महिलेवर बलात्कार झाला आणि तिचा खून किंवा तिची अवस्था मेंदूमृत (व्हेजिटेटिव्ह) अशी झाली तर दोषीला फाशीच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. सामूहिक बलात्काराच्या घटनेत दोषींना कमाल वीस वर्षांच्या शिक्षेऐवजी अपराजिता विधेयकात आजीवन तुरुंगवास किंवा फाशीची शिक्षा याची तरतूद करण्यात आली आहे. अल्पवयीन मुलींवर अत्याचार झाले तर दोषींना पॉक्सोमधील तरतुदींपेक्षा कठोर तरतुदी अपराजिता विधेयकात करण्यात आल्या आहेत. बलात्कार घटनांचा तपास दोन महिन्यात करण्यात यावा अशी सध्या असणारी तरतूद अपराजिता विधेयकात बदलण्याचा प्रस्ताव आहे आणि ती मुदत एफआयआरनंतर अवघ्या २१ दिवसांवर आणण्यात आली आहे. प्रकरणाची सुनावणी जलदगती न्यायालयांनी तीस दिवसांत पूर्ण करावी अशीही तरतूद त्यात आहे. या सगळ्या तरतुदींना विरोध करावा असे वरकरणी त्यात काही नाही. कोलकाता प्रकरण काय किंवा बदलापूर घटना काय; न्यायालयांनी पोलीस यंत्रणांवर ताशेरे ओढले आहेत हे विसरता कामा नये. मात्र हा दोष केवळ पोलीस यंत्रणांचा नव्हे. राजकीय हस्तक्षेप आणि लागेबांधे हाही त्यातील महत्त्वाचा घटक. कायदे असूनही हे होत असेल तर कायदे कितीही कठोर केले म्हणून काही निराळे घडेल असे मानणे भाबडेपणाचे. देशात बलात्काराच्या घडलेल्या घटनांची संख्या २०२२ साली ३१ हजार इतकी होती. ही संख्या कोणत्याही समाजाला लाजिरवाणी. पण यातील बहुतांशी खटले हे न्यायालयीन प्रक्रियेत प्रलंबित आहे. सरकारांनी जलदगती न्यायालयात खटला चालविण्याची कितीही हमी दिली तरी प्रत्यक्षात खालच्या न्यायालयांच्या निकालांना वरच्या न्यायालयांत गुन्हेगारांकडून आव्हान देण्यात येते. तेथे पुन्हा सुनावणी होते; तारखा पडतात आणि अनेकदा खालच्या न्यायालयांनी दिलेल्या शिक्षांमध्ये बदल होतो. याचे कारण कायद्याचे आकलन न करता खालची न्यायालये निकाल देऊन टाकतात असे वरच्या न्यायालयांचे निरीक्षण आहे. आकडेवारी असे सांगते की २०२३ साली देशभरात एकूण १२० दोषींना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली; त्यांतील ५३ टक्के प्रकरणे ही लैंगिक अत्याचारांची होती आणि त्यांतील ७५ टक्के प्रकरणे ही वय वर्षे बाराखालील मुलींवर घडलेल्या लैंगिक अत्याचारांची होती. पण याचा अर्थ दोषींना प्रत्यक्षात फाशीची शिक्षा झाली असा नाही. किंबहुना देशभरात महिलांवरील अत्याचाराच्या घटनांचे सुमारे ९५ टक्के खटले कोणत्या न कोणत्या न्ययालयात प्रलंबित आहेत. जे खटले निकाली निघाले त्यांत शिक्षा होण्याचे (कन्व्हिक्शन) प्रमाण केवळ २६ टक्के आहे. त्यातही ज्या राज्यांत शिक्षा होण्याचे प्रमाण अत्यल्प आहे त्यांत पश्चिम बंगालचा (सुमारे ३ टक्के) समावेश आहे. याचाच अर्थ दोषींना शिक्षा व्हावी यासाठी न्यायाच्या फुटपट्टीवर उतरतील असे पुरावे गोळा करणे, साक्षीदारांना विश्वासात घेऊन त्यांचे जबाब नोंदविणे प्रभावी युक्तिवाद करणे इत्यादीत यंत्रणा कमी पडतात. शिवाय ज्यांना फाशीची शिक्षा होते त्यांनाही लगेच फासावर लटकवण्यात येते असे नाही. निर्भया प्रकरणातील दोषींना २०२० साली फाशी देण्यात आले. फाशीची शिक्षा झाली असूनही ती अमलात न आणलेले असे ५६१ गुन्हेगार आजमितीस देशभरातील वेगवेगळ्या तुरुंगांत आहेत. हे सगळे चित्र पाहिले की अपराजिता विधेयकात खरोखरच व्यावहारिकता आहे का असा प्रश्न उपस्थित झाल्यावाचून राहणार नाही. निर्भया प्रकरणानंतर नेमण्यात आलेल्या न्यायमूर्ती जे एस वर्मा समितीने अनेक शिफारशी केल्या होत्या; मात्र फाशीच्या शिक्षेची तरतूद करू नये अशीच शिफारस त्यांनी केली होती. फाशीच्या शिक्षेची तरतूद बलात्कारासारख्या घटनांना प्रतिबंध करीत नाही हे सिद्ध करणारे पर्याप्त पुरावे आहेत अशी टिप्पणी त्यांनी केली होती. अपराजिता विधेयकानंतर अनेक तज्ज्ञांनी फाशीच्या शिक्षेची तरतूद अनुचित असल्याची प्रतिक्रिया दिली आहे. जेथे बलात्कार करणारी व्यक्ती माहितीतील असते तेथे मग गुन्हा दाखल होण्याचे प्रमाण घटू शकते असा धोक्याचा इशारा त्यांनी दिला आहे. बदलापूर येथे आंदोलक 'आताच्या आता आरोपीला फाशी द्या' अशी मागणी करीत होते. पण सरकारांनी त्या मोहास बळी पडून लोकानुनयी कायदे करावेत का हा खरा प्रश्न आहे. बलात्काराच्या गुन्ह्यांसाठी ज्या देशांत सध्या फाशीची शिक्षा आहे त्यांत इजिप्त, पाकिस्तान, संयुक्त अरब अमिरात, सौदी अरेबिया, बांगलादेश, अफगाणिस्तान अशांचा समावेश आहे तर जेथे जन्मठेप किंवा तुरुंगवासाची शिक्षा आहे अशांत अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स अशा देशांचा अंतर्भाव आहे. मात्र याहून महत्त्वाचा भाग म्हणजे तेथे तपास आणि शिक्षा होण्याचे प्रमाण किती हा. बलात्काराच्या वा लैंगिक अत्याचारांच्या नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्यांत शिक्षा होण्याचे प्रमाण ब्रिटनमध्ये सुमारे ६० टक्के; कॅनडात ४२ टक्के तर अमेरिकेत ५८ टक्के आहे. भारत याबाबतीत किती पिछाडीवर आहे याचा अंदाज येईल. तेव्हा मूलभूत समस्या कठोर कायदे नसणे ही नसून योग्य, जलद तपास न होणे आणि वेळेत निकाल न लागणे ही आहे. ममता सरकारने अपराजिता विधेयक आणून सरकारविरोधात असणारा सार्वत्रिक रोष काही प्रमाणात कमी करण्यात यश मिळविले असेल. पण महिलांवरील अत्याचार कमी होणार का? विधेयक संमत करण्यात सरकारांची इतिकर्तव्यता नव्हे– मग ते ममता सरकार असो की राज्यातील महायुतीचे सरकार असो किंवा केंद्रातील सरकार असो. जबाबदारी महिलांना त्याचे हक्क आणि सुरक्षितता देण्याची आहे आणि असायला हवी. ममता सरकारची कामगिरी त्या बाबतीत यापुढे कशी राहते हा अपराजिता विधेयक आणण्यामागील त्यांचा हेतू राजकारणापलीकडचा होता का हे तपासण्याचा खरा निकष असेल.

# ८ सप्टेंबर आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस

अत्याधुनिक युगात १०० टक्के जनता साक्षर होणे गरजेचे. १९६५ मध्ये ८ ते १९ सप्टेंबर दरम्यान इराणची राजधानी तेहरान येथे जगभरातील शिक्षणमंत्र्यांची एक बैठक झाली. यानंतर १९६६ साली संयुक्त राष्ट्रसंघाने शिक्षणप्रणालीमध्ये जागरूकता वाढावी याउद्देशाने ८ सप्टेंबर रोजी आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. तेव्हापासुन जगभरात ८ सप्टेंबरला दरवर्षी साक्षरता दिवस म्हणून साजरा करण्यात येतो.म्हणजेच देशाची प्रगती असो वा स्वतःची प्रगती असो शिक्षण अत्यंत महत्त्वाचे असते.हाच उद्देश साक्षरतेचा आहे.कारण यातुनच आयुष्याची जडणघडण निर्माण होते व मन्युष्य घडतो.आज अनेक देश प्रगतीपथावर आहेत.परंतु आफ्रिका आणि आशिया खंडात साक्षरतेचे प्रमाण कमी दिसून येते.याचे मुख्य कारण म्हणजे अशिक्षितपणा, बेरोजगारी,भुकमरी, कुपोषण व जंगली जीवन आहे.आजही भारतसुध्दा पुर्णपणे साक्षर नाही.याकरीता सरकारला मोठे अभियान चालविण्याची गरज सध्याच्या परिस्थितीत फक्त ६० टक्के साक्षर आहे.देशात साक्षरतेच्या अभावामुळेच शेतकऱ्यांच्या आत्महत्यां होत आहे.त्या रोखण्याचा संकल्प ८ सप्टेंबरला घेऊन साक्षरता अभियान युध्दपातळीवर व्हायला पाहिजे. कारण बदलत्या काळानुसार १०० टक्के साक्षर होणे गरजेचे आहे.भारतातील केरळ हे असे एकमेव राज्य आहे की ते १०० टक्के साक्षर आहे.आजच्या परिस्थितीत ज्या देशात साक्षरतेचे प्रमाण कमी आहे तो देश मागासलेल्या देशाच्या रांगेत येतो. भारतातील आदीवासी भाग व अती दुर्गम भाग अजून पर्यंत साक्षर नाही त्यामुळे त्यांना अनेक कठीण प्रसंगांचा सामना करावा लागतो.साक्षरतेच्या अभावामुळे देशातील अनेक दुर्गम भागातील राज्यात नक्षलवादाचा किंवा गुन्हेगारांचा जन्म होतो.अती दुर्गम भागात पोषक आहाराची व योग्य शिक्षणाची गरज आहे अन्यथा येथुनच कुपोषण,भुकमरी, वाममार्ग व आत्महत्येचा उदय होत असतो.भारतातील वाढती लोकसंख्या ही साक्षरतेच्या अभावामुळेच निर्माण झालेली मोठी समस्या आहे.भारतातील वाढत्या लोकसंख्येमुळे धर्मा–धर्मात कटुता निर्माण होते आणि धर्माच्या नावावर लोकसंख्या वाढवीण्याची शर्यत लागते. यामुळेच भारताला लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी मोठी अडचण निर्माण होत आहे. भारतातील वाढती लोकसंख्या नियंत्रीत ठेवण्यासाठी भारताने साक्षरता अभियान युध्दपातळीवर चालवायला हवे. जगातील अनेक देश प्रगतीपथावर आहेत.आज प्रत्येक देशाजवळ मोठ्या प्रमाणात दारुगोळा आणि अत्याधुनिक शस्त्रसामग्रीचा साठा आहे.परंतु जर तो देश साक्षर नसेल तर काय फायदा असे देश मागासल्यामध्ये गणल्या जातात.आज पाकिस्तान फक्त २० टक्के साक्षर आहे.त्यामुळे तो गेल्या ७७ वर्षाच्या काळात तो कवडीचीही प्रगती करू शकला नाही. पाकिस्तानने फक्त आतंकवाद्यांना खतपाणी घालण्याचे काम केले व आताही करीत आहे व याचा परिणाम आज संपूर्ण पाकिस्तान रक्ताच्या लाथोळ्यात लथफतलेला दिसून येतो.त्यामुळेच आज पाकिस्तानाच्या हातात भिकेचे ढोबर दिसून येते व आजच्या परिस्थितीत पाकिस्तान जगातील आतंकवाद्यांचे माहेरघर बनले आहे. जगातील प्रत्येक देशांनी ८ सप्टेंबर आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाचे औचित्य साधून प्रत्येक देशांनी साक्षरता अभियान युध्दपातळीवर चालवायला पाहिजे. यामुळे देश प्रगतीपथावर येईल.आजच्या यांत्रिकी युगात युवावर्ग मोबाईलमध्ये गर्क असतो.त्यामुळे नवीन नवीन अनेक व्याधी निर्माण होवू शकते याला नाकारता येत नाही.याकरिता साक्षरतेच्या माध्यमातून जनजागृती करून मोबाईल पासून होणाऱ्या नुकसानाबद्दल सूध्दा जागृती करणे आज गरजेचे आहे.आज स्वीडनमध्ये दोन वर्षांखालील मुलांना मोबाइल, टीव्ही पाहण्यास बंदी घालण्यात आली आहे.देशाच्या सार्वजनिक आरोग्य संस्थेच्या मते स्क्रीनचा वापर शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम करत असल्याने लहान मुलांना डिजिटल मीडिया आणि टेलिव्हिजनपासुन पूर्णपणे दूर ठेवले पाहिजे.हा संपूर्ण परीणाम साक्षरतेच्या अभावामुळे निर्माण झाल्याचे दिसून येते.साक्षरता म्हणजे फक्त शिक्षण नसुन आपुलकी,खान–पाण, रहाणीमान,देशाचा विकास, पारिवारिक सुख–दु:ख, सुविधा, परिपक्वता,संस्कृती, आरोग्याची काळजी, सोशल मिडियापासुन लहान मुलांवर होणारे दुष्परिणाम ह्या संपूर्णबाबी साक्षरतेमध्ये मोडत असतात.आज संपूर्ण जग बारूदच्या ढीगाऱ्यावर बसलेले आहे.त्यामुळे पृथ्वी नष्ट व्हायला काहीच वेळ लागणार नाही. आज जगात महाप्रलय, भुकंप, सुनामी, अतिउष्णता, अतिथंडी, ज्वालामुखीचा उद्रेक ह्या संपूर्ण विनाशकारी घटना मानवाने स्वतःहून ओढवल्या आहेत. जगात सध्याच्या परिस्थितीत जंगल तोड मोठ्या प्रमाणात सुरू आहे यामुळे पृथ्वीतलावरील सर्वांचा जीव धोकादायक स्थितीमध्ये आल्याचे दिसून येते. ह्या सुध्दा साक्षरतेच्या अभावामुळेच निर्माण झालेल्या समस्या आहेत. आंतराष्ट्रीय साक्षरता दिनाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात साक्षरता अभियान छेडुन मानवजाती, जिवजंतु, पर्यावरण व निसर्ग यांना वाचविले पाहिजे.कारण मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे त्यामुळे तो स्वतःच्या स्वार्थासाठी कोणत्याही स्तरावर जात असतो अशा परिस्थितीत तो मागचा–पुढचा कुठलाही विचार करीत नाही व याचा दुष्परिणाम संपूर्ण मानवजातीला व जीवसृष्टीला भोगावा लागतो. ह्या संपूर्ण बाबी साक्षरतेच्या अभावामुळे निर्माण झाल्याचे दिसून येतो.त्यामुळे साक्षरतेमध्ये सर्वच स्तरातून विचार व्हायला हवा.म्याझॉनसारखे जंगल जळने,वनवे लागले, महाप्रलय येणे हे सर्व साक्षरतेच्या अभावामुळे निर्माण झालेली परिस्थिती आहे असे मला वाटते. निसर्गाचे वाटोळे मानवाने केले, जंगल संपदा मानवाने नष्ट केली, नवीन–नवीन समस्या मानवाने निर्माण केल्या यामुळेच आज पृथ्वी भयभीत आहे.मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी पृथ्वीच्या पोटातील संपूर्ण पाणी निचोड्डुन टाकले यामुळेच आज अनेक देश पीण्याच्या पाण्यासाठी रेडझोनमध्ये आल्याचे दिसून येते.याला साक्षरतेच्या माध्यमातून जनजागृती करून वाचविले पाहिजे.याकरिता जगातील प्रत्येक देशांना युध्दपातळीवर प्रयत्न करण्याची गरज आहे.आज प्रत्येक देश युद्धासाठी सज्ज आहे त्यापध्दतीने प्रत्येक देशांनी आपली तयारी केली आहे.म्हणजे जग आज तिसऱ्या महायुध्दाच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचले आहे.याला साक्षरता अभियानाच्या माध्यमातून रोखले पाहिजे. जगातील प्रत्येक देशांनी प्रगती अवश्य करावी.परंतु मानवजातीच्या कल्याणासाठी व जे निसर्गाच्या सानिध्यात रहातात (पशुपक्षी,वण्यप्राणी) त्यांच्यावर कोणताही प्रकारचा अन्याय होणार नाही याचीही काळजी घेतली पाहिजे.यातच आपल्या खरा आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस दिसून येईल. चारित्र्य बनविण्यासाठी, चांगलेव्यक्तीत्व निर्माण करण्यासाठी जो कोणी प्रयत्न करेल तोच खरा साक्षरतेचा भागीदार आहे.८ सप्टेंबर आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवसाचे औचित्य साधून जगभरातील प्रत्येक देशांनी साक्षरता अभियानासोबत बदलत्या हवामानावर मात करण्यासाठी वृक्षलागवड अभियान युध्दपातळीवर चालवायला पाहिजे.यामुळे निसर्ग प्रफुल्लित रहाण्यास मोठी मदत होईल.

*********

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर) मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# स्त्रीवरील अत्याचार एक जुलमी अनिष्ट रूढीच!

जुन्या काळात की जो एक अन्यायग्रस्त,विषमतावादी काळ होता. त्या काळात महिलावर अनिष्ट जुलमी प्रथा, रूढी,बंधने लादल्या गेली होती, की या बंधनामुळे महिलांना सर्वच प्रकारचे हक्क व अधिकार नाकारण्यात आले होते.महिला फक्त उपभोग्य वस्तु , चुल आणि मुल एवढ्या पुरतीच मर्यादित आहे,अशी समाजाची एक धारणा बनली होती. हि जुलमी बंधनं एक प्रकारे त्या काळातील खूप मोठा अत्याचार तर होताच,शिवाय महिला वरील खूप मोठा जुलमी अन्याय पण होता. तसेच देशात आजची परिस्थिती पाहता,महिलावर जे जुलमी अमानुष अत्याचाराच्या,बलत्काराच्या लैंगिक शोषणाच्या,नग्नधिंड,या अशा ज्या काही घटना घडतांना दिसत आहेत,त्यावरून असे वाटते की, हा अत्याचार आजच्या काळातील जुलमी अनिष्ट रूढीच आहे की काय?.किती महिला अत्याचाराच्या घटना घडल्या किती घडत आहेत. देशात स्त्री अत्याचाराचे सत्र थांबता थांबेना अशी परिस्थिती झाली आहे.अत्याचाराच्या या छळाने सारा देश ढवळून निघाला! दररोजचे वर्तमानपत्र उघडून पाहिले, की त्यात स्त्री अत्याचाराची बातमी असतेच.

जी स्त्री हजारो वर्षे गुलामीत,अन्याय अत्याचाराने पिचत पडलेल्या गर्तेत होती, ती स्त्री महापुरुषांच्या,महामानवांच्या पुण्याईने त्यांनी दिलेल्या संविधानामुळे बंधमुक्त झाली,स्वतंत्र झाली,निर्भय झाली,तिला पुरुषाबरोबरीचा शिकण्याचा,जगण्याचा अधिकार मिळाला. आज ती पुरुषाप्रमाणे प्रगती करत असताना,तिच्यावर छेडछाड,बलत्कार,अत्याचार व त्यातुन तिची हत्या होते.खरच ती स्त्री सुरक्षीत आहे का? ती निर्भय आहे का? याचे उत्तर नाही असेच सापडेल. दीड वर्षा अगोदर मणिपुर मध्ये(वंशभेदावरुन) देश हादरुन सोडणारी घटना घडली.की महिलांची नग्न धिंड काढली. केवढा हा जुलमी अत्याचार! आता नुकतीच कोलकाता येथील एका डॉक्टर महिलेवर बलत्कार करुन तिची केलेली हत्या. तेच होत नाही तर महाराष्ट्रातील बदलापूर तेथे दोन चिमुकल्या मुलीवर लैंगिक छळाची घटना.अशीच घटना डिसेंबर २०१२ मध्ये घडली होती.निर्भया बलात्कार हत्याकांड प्रकरण त्यावेळेस संपूर्ण देश पेटुन उटला होता, त्यावेळी देशात अशा अत्याचाराला आळा घालण्यासाठी कडक कायदे असावे तसे कायदे बनवण्यासाठी रात्रभर संसदेचे कामकाज सुरू होते.देशाच्या नावावर कंलक आहेत अशा घटना. आजही देशात राष्ट्रीय गुन्हे रिकॉर्ड ब्यूरो च्या अहवालानुसार दररोज ८७ महिलावर अत्याचार होतात.किती खालावली आमची मानसिकता!जग कुठे चालले आणि आपल्या देशात काय चालू आहे. पृथ्वी सोडून दुसऱ्या ग्रहावर राहायला जायचा जग विचार करत आहे.आणि आमचे विचार पहा.

देशात सध्या बलत्काऱ्यांना फाशीच्या शिक्षेचे अंमलबजावणीचे दोन हजाराच्या वर प्रकरणं राष्ट्रपतीकडे प्रलंबित आहेत.आणि त्यात दररोज महिला अत्याचाराच्या घटना घडणे चालूच आहेत.म्हणुन महिला वरील होत असलेल्या अत्याचाराबाबत भारताच्या राष्ट्रपतींनी सुध्दा चिंता व्यक्त केली आहे. आता नुकत्याच राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या हस्ते मुंबई येथे विधान परिषदेचा शतक महोत्सव सोहळा पार पडला,त्यावेळी त्यांनी देशातील व राज्यातील महिला वरील अत्याचाराच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर भारतीय समाजाला(मार्मिक) भावनिक भाष्य केले. त्या म्हणाल्या महिलांना योग्य सन्मान व प्रतिष्ठा मिळावी म्हणून समाजात काही ठिकाणी स्त्रियांकडे पाहण्याचा जो चुकीचा दृष्टिकोन आहे,तो बदलण्याची गरज आहे.खुप मोठी मनातील भावना त्यांनी बोलुन दाखवली,* मग तो चुकीचा दृष्टिकोन कोणता आहे. तर भारतीय समाजात काही लोकांमध्ये असणारा स्त्रीबद्दलचा पाहण्याचा वाईट दृष्टिकोन आणि त्या वाईटपणाला पोषक असणारं वातावरण,कुठेतरी तरुणांचा घोळका दोन तीन तरुण मुलीच्या मागे जोरजोराने हसत, सिटी वाजवत, चाळे करत, टिंगलटवाळी करत जात असताना आम्ही पाहिले आहे. कोण्या चौकात, मोक्याच्या ठिकाणी, बसस्थानक, अशा ठिकाणी उभे राहून महिलांचे,तरुण मुलींचे चुकीच्या भावनेने निरीक्षण करने, किंवा कोण्या पानटपरीवर उभे राहून गुटका,पान चावत रस्त्याने जाणाऱ्या महिलांना, तरुण मुलींना वाईट दृष्टीने पाहणे.मोबाईलवर अश्लील चित्रफीत पाहणे, दारु पिऊन रस्त्यावर धिंगाणा करणे अशा ह्या सध्याच्या काळातील वाईटपणा अनिष्ट रूढीच आहेत. त्यावर आळा बसने गरजेचे आहे. समाजाने तसेच महिलांनी या वाईट गोष्टीला आळा घालण्यासाठी पुढे आले पाहिजे.पण आम्ही फक्त पाहतो, पण विरोध मात्र करत नाही. त्यामुळे या वाईट गोष्टी वाढत वाढत जातात आणि त्यातूनच अपप्रवृत्ती जन्म घेते, म्हणजे बलात्कार, अत्याचार या घटना घडतात.हा जो वाईटपणा आहे, हा वाईटपणा भारतीय समाजाला लागलेला फार मोठा कलंक आहे.,त्यामध्ये सुधारणा घडून आणणे गरजेचे आहे,अन्यथा अत्याचार चालूच आहेत.* काही लोक म्हणतात मुलामुलींचे शाळा कॉलेज वेगवेगळे ठेवा. काही म्हणतात ७ वाजण्याच्या अगोदर मुलींना घरी बोलवा, काही म्हणतात गावात शाळा आहे, तिथपर्यंतच शिकवा. बाहेर ठिकाणी शिक्षण घेण्याकरिता पाठवू नका. मग असे करणे म्हणजे मुलींना शिक्षणापासून रोखणेच आहे नाही का? महिलावर ती बंधने लादण्यासारखेच नाही का? हा उपाय आहे का अत्याचार रोखण्याचा! तर नाही. त्यापेक्षा राज्यकर्त्यांवर कडक कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी दबाव आणा. डॉ बाबासाहेब आंबेडकर जातीव्यवस्थेचे निर्मुलन या पुस्तकात लिहितात सामाजिक क्षेत्रातील कार्यक्षमतेशिवाय जीवनाच्या इतर क्षेत्रात कायमस्वरूपी सुधारणा शक्य नाही.कारण दृष्ट रुढींनी निर्माण निर्माण केलेल्या अनिष्ट रुढीचे निर्मुलन करण्यासाठी आम्ही प्रयत्न केले पाहिजे.

**********

विनोद सरदार, फुले आंबेडकर विद्वत सभा. मो.नं.९६८९८४७११५

# भारतीय राज्यघटनेतील मूलभूत अधिकार

सर्व प्रथम भारतीय संविधानाला नमन करतो.प्रत्येक व्यक्तीला सर्वांगीण विकासासाठी काही अधिकारांची नितांत आवश्यकता असते.व्यक्तीला काही विशिष्ट अधिकार असल्याखेरिज व्यक्ती आपला विकास साधू शकत नाही.व्यक्तीला काही नैसर्गिक अधिकार असतात तर काही अधिकार राज्य बहाल करीत असते.व्यक्तीच्या किंवा समाजाच्या सुखी व समृद्ध जीवन जगण्यासाठी राज्याचा उदय व विकास झाला. त्यामुळे व्यक्तीच्या अधिकाराचे संरक्षण करणे हे राज्याचे आद्य कर्तव्य ठरते.अधिकार व्यक्तीची मूलभूत गरज असते.भारतीय राज्यघटनेत तिसऱ्या भागात मूलभूत अधिकाराचा समावेश करण्यात आलेला आहे.व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी मूलभूत अधिकाराची आवश्यकता असते.मूलभूत अधिकारातून व्यक्ती स्वातंत्र्याची जपणूक होत असते कारण मूलभूत अधिकारावर आक्रमन झाल्यास न्यायालयात दाद मागता येते.

* मूलभूत अधीकारांचे एकूण ६ प्रकार आहेत तसे मूळ घटनेत ७ प्रकार होते. भारतीय संविधानाने नागरिकाला ६ मूलभूत अधिकार दिलेले असून संविधानाच्या तिसऱ्या भागात कलम १२ ते ३५ मध्ये वर्णन केलेले आहे.

१) सामानतेचा अधिकार :– संविधानात कलम १४ ते १८ या मध्ये समातेचा अधिकार देण्यात आला आहे.समता हा लोकशाहीचा प्रमुख आधार आहे.

* कलम १४ कायद्यापुढे समानता – कलम १४ नुसार असे स्पष्ट केले आहे की, कायद्यानुसार सर्व नागरिक समान आहेत तसेंच कोणालाही कायद्याच्या समान संरक्षणापासून वंचित केले जाणार नाही याची हमी देण्यात आली आहे. कायद्यासमोर धर्म,लिंग,जात,वंश गरीब – श्रीमंत असा भेद केला जाणार नाही.
* कलम १५ नुसार राज्य केवळ धर्म,वंश,जात,लिंग,जन्म यापैकी कोणत्याही कारणावरून कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशाप्रकारे भेदभाव करणार नाही. तसेंच दुकानें विहिरी,तलाव,रस्ते, सार्वजनिक करमणूकीचे ठिकाणे,उपहारगृह अश्या ठिकाणी कोणाही व्यक्तीस प्रवेश नाकारला जाणार नाही.
* कलम १६ नुसार शासकीय नोकऱ्या व सार्वजनिक पदे देतांना सर्वांना समान संधी दिली जाईल.धर्म,वंश,जात,लिंग,जन्म या कारणावरून कोणालाही अपात्र ठरविता येणार नाही.
* कलम १७ नुसार अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे तसेच कोणत्याही स्वरूपात अस्पृश्यता पाळण्यास मनाई करण्यात आली असून अस्पृश्यता पाळणे गुन्हा समजला जाईल.
* कलम १८ नुसार राज्य लष्करी व शिक्षणविषयक पदव्याव्यकतिरिक्त कोणतीही पदवी प्रदान करू शकणार नाही तसेंच पूर्वपरवानगीशिवाय भारतीय नागरिकाला परकीय पदवी स्वीकारता येणार नाही मात्र भारत सरकार लष्करी व भारतरत्न,पद्मश्री, पद्मभूषण अशा पदव्या देऊ शकेल.
* १९ नुसार स्वातंत्र्याच्या अधिकराचे वर्णन करण्यात आले असून मूळ संविधानाने ७ प्रकारचे स्वातंत्र्ये होती परंतु ४४ व्या घटना दुरुस्तीने संपत्तीचा अधिकार वगळण्यात असल्याने आता ६ प्रकारचे नागरिकांना प्राप्त झाली आहे ते भाषण व विचारस्वातंत्र्य, शांततापूर्वक शस्त्राशिवाय सभा भरविण्याचे स्वातंत्र्य,संस्था व संघ स्थापन करण्याचे स्वातंत्र्य,भारतात सर्वत्र संचार करण्याचे स्वातंत्र्य,भारतात कुठेही वास्तव करण्याचे स्वातंत्र्य,कोणताही व्यवसाय किंवा व्यापार करण्याचे स्वातंत्र्य.
* कलम २० व्या कलमनुसार अपराधांच्या दोषसिद्धीबाबत संरक्षण यात १) नो एक्सो फक्टो लॉ (कायद्याचा अंमल नाही) व्यक्तीने या कायद्याचा भंग केल्यासच तो दोषी असेल आणि प्रचलित कायद्याने सांगितलेल्या शिक्षेपेक्षा अधिक शिक्षा देता येणार नाही. २) नो डबल जिओपर्डी (दुहेरी शिक्षा नाही) यात एकाच अपराधाबद्दल एकापेक्षा अधिक वेळेस खटला व शिक्षा देता येणार नाही. ३) स्वतः विरुद्ध साक्षीदार होण्याची सक्ती नसणे.
* कलम २१ नुसार जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्य यांचे संरक्षण कायद्याने प्रस्थापित कार्यपद्धतीशिवाय कोणत्याही व्यक्तीस तिचे जीवित व्यक्तिगत स्वातंत्र्य या पासून वंचित केले जाणार नाही.
* कलम २१अ नुसार नुसार शिक्षणाचा हक्क आहे. ६ ते १४ वयोगटातील मुलांना सक्तीचे व मोफत शिक्षण नमूद आहे
* कलम २२ नुसार अटक व स्थानबद्धता या पासून संरक्षण.
* कलम २३ नुसार शोषणाविरुद्ध अधिकार त्यात माणसाच्या क्रय – विक्रीय करण्यावर आणि जबरदस्ती काम करून घेण्यावर बंदी घातली आहे. कोणत्याही व्यक्तीला गुलाम कोणीही बनवू शकणार नाही.या नुसार बेठबिगार,देवदासी पद्धती बंद करण्यात आल्या आहेत.मात्र सार्वजनिक कार्यासाठी सक्तीने नोकरीं लादता येईल.
* कलम २४ नुसार १४ वर्षाच्या आतील मुलांना खाणी, कारखाने किंवा इतर धोक्याच्या ठिकाणी कामावर ठेवले जाणार नाही.यांचा भंग करणाऱ्यावर कायद्यानुसार शिक्षा दिली जाईल.कल्याणकारी राज्य व समताधिष्टत समजरचनेच्या निर्मितीसाठी शोषणाविरुद्ध अधिकार महत्वपूर्ण मानला जातो.
* कलम २५ नुसार धार्मिक स्वातंत्र्याच्या अधिकाराचे वर्णन केले आहे.सार्वजनिक सुव्यवस्था,नीतिमत्ता व स्वास्थ यात बाधक नसणाऱ्या बाबतीत सर्व नागरिकांना आपल्या विवेकानुसार वागण्याचे समान हक्क आहेत तसेच स्वाधर्माचे आचरण,प्रचार व उच्चर करण्याचा हक्क आहे.परंतु समाजसुधारणेचे कायदे करून अस्पृश्यता निर्मूलन,नरबळी,बहुपत्नीत्व अशा अनिष्ट रूढीवर बंधन घालण्याचा अधिकार राज्यस आहे तसेच धार्मिक संस्था जर राजकीय,आर्थिक किंवा अन्य स्वरूपाची कामे करीत असतील तर अशा कार्यावर सरकार नियंत्रण ठेवू शकेल.
* कलम २६ नुसार प्रत्येक धर्म संप्रदायास धार्मिक संस्था स्थापन करण्याचा व व्यवस्थापन,त्याचा कारभार पाहण्याचा व संपत्ती बागळण्या अधिकार आहे.
* कलम २७ नुसार कोणत्याही धर्माच्या प्रचारासाठी जबरदस्तीने आर्थिक निधी गोळा करण्यावर बंदी घातली आहे.
* कलम २८ नुसार पूर्णपणे शासकीय खर्चावर चालणाऱ्या शिक्षणसंस्थेत कोणत्याही धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही.मात्र गैरशासकीय शैक्षणिक संस्थामध्ये धार्मिक शिक्षण देण्यास काहीही हरकत नाही.अर्थात ते शिक्षण घेतलेच पाहिचे अशी सक्ती कोणावरही करता येणार नाही.भारतात 'धर्मनिरपेक्ष राज्य' निर्मितीच्या दृष्टीने हा अधिकार अतिशय महत्वपूर्ण आहे.
* कलम २९ नुसार भारतात कोठेही राहणाऱ्या नागरिकाला,समूहाला स्वतःची भाषा, लिपी, संस्कृती याची जोपासना करण्याचा अधिकार आहे. शासकीय खर्चावर चालणाऱ्या कोणत्याही शिक्षण संस्थेला केवळ धर्म,वंश,जात,भाषा यापैकी कोणत्याही कारणावरून प्रवेश नकारता येणार नाही.मात्र शिस्त,पात्रता,लिंग,जन्मस्थान यावरून प्रवेश नाकारू शकतात.
* कलम ३० नुसार अल्पसंख्यक समुदयांना आपल्या इच्छेनुसार धर्म किंवा भाषेच्या आधारावर शिक्षण संस्था स्थापन करण्याचा व ती चालवण्याचा अधिकार असेल. कोणत्याही शिक्षण संस्थेला मदत करताना राज्य पक्षात करणार नाही.या अधिकरामुळे भारतातील विविध,धार्मिक अल्पसंख्यकांना आपल्या राष्ट्रीय,भाषा,अस्मिता यांचे संरक्षण करणे सहज साध्य झाले.
* कलम ३१ रद्द करण्यात आले आहे ४४ व्या घटना दुरुस्तीने.आता ही कलम घटनेतून वगळण्यात आली आहे.

कलम ३२ नुसार संविधानाने जे मूलभूत अधिकार नागरिकांना दिलेले आहे ते उपभोगता आले पाहिजे व त्याचे संरक्षण झाले पाहिजे त्यासाठी घटनात्मक उपायाचा अधिकार नागरिकांना देण्यात आला आहे.या अधिकाराची नोंद कलम ३२ ते ३५ मध्ये करण्यात आली आहे.या अधिकारानुसार नागरिकांना न्यायालयात तक्रार करून आपल्या अधिकारावर झालेले अतिक्रमण दूर करता येते.शिवाय मूलभूत हक्काच्या योग्य अंमलबजावणीसाठीही दाद मागता येते.नागरिकांना दिलेल्या मूलभूत अधिकाराचे जर संरक्षण होत नसेल तर ते अधिकार निरर्थक ठरतात म्हूणनच भारतीय संविधानात अधिकाराच्या संरक्षणासाठी घटनात्कम उपायाचा अधिकार समाविष्ट करण्यात आला आहे.नागरिक मूलभूत अधिकाराच्या संरक्षणासाठी जेव्हा न्यायालयाकडे अर्ज करते तेव्हा न्यायालयाला पुढील पाच प्रकारचे आदेश काढता येतात. हे आदेश सर्व व्यक्ती, संस्था, संघटना व राज्य यावरून असतात. ते आदेश आहेत –

१ – बंदी प्रत्यक्षीकरण
२ – परमादेश
३ – प्रतिषेद
४ – अधिकार पुच्छा
५ – उत्प्रेषण

या पाच प्रकारच्या आदेशातून घटनात्मक उपायच्या अधिकाराचा अवलंब करून मूलभूत अधिकाराचे संरक्षण केले जाते, डॉ.बाबासाहेब आंबेडकर या कलमातील तरतूद वर्णन करताना म्हणतात की, ३२ वे कलम हे संविधानातील सर्वात महत्वाचे कलम असून घटनात्मक उपाययोजनेचा अधिकार हा राज्यघटनेचा आत्मा व हृदय आहे.अशा प्रकारे भारतीय संविधानात कलम १२ ते ३५ मध्ये मूलभूत अधिकार समाविष्ट आहेत.भारतात राजकीय लोकशाहीच्या विकासाबरोबरच सामाजिक व आर्थिक लोकशाही प्रस्थापित व्हावी व सामाजिक न्यायावर आधारित समजरचना निर्माण व्हावी हे त्याचे मुख्य उदिष्ट आहे.

*********

अखिल मेश्राम–९६२३२७२८०४,पुणे.
स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक/
एमपी एसी हब संचालक/
लेखक/ मोटिवेटर

# वाढलेले वजन कमी करण्यासाठी प्रभावी ठरेल 'या' बियांचे पाणी, आरोग्याला होतील फायदे



जेवणातील सर्वच पदार्थांमध्ये कोथिंबिरीचा वापर केला जातो. कोथिंबीर पदार्थांची चव आणि सुगंध वाढवण्याचे काम करते. कोथिंबिरीच्या पानांसोबतच धणे सुद्धा जेवणात वापरले जाते. बाजारात धणा पावडर सहज उपलब्ध होते. धणे पावडरचा वापर भाजी, सूप किंवा मसाला बनवताना केला जातो. पोटासंबंधित समस्या उद्भवल्यानंतर धण्याचे पाणी पिण्यास दिले जाते.यामुळे बिघडलेली पचनक्रिया सुधारते आणि आरोग्याला अनेक फायदे होतात. खाण्यापिण्याच्या सवयींमध्ये बदल झाल्यानंतर आरोग्य बिघडण्याची शक्यता असते. अशावेळी पोटासंबंधित अनेक समस्या उद्भवतात. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला धण्याच्या बियांचे पाणी प्यायल्यामुळे आरोग्याला नेमके काय फायदे होतात, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया. धण्याचे पाणी प्यायल्यामुळे आरोग्याला होणारे फायदे: पचनक्रिया सुधारते: सकाळी उठल्यानंतर रोज रिकाम्या पोटी धण्याचे पाणी प्यायल्यास बिघडलेली पचनक्रिया सुधारण्यास मदत होते. यासाठी एक ग्लास कोमट पाण्यात धणे भिजत ठेवावे. रात्रभर धणे भिजल्यानंतर सकाळी उठल्यावर धणे गाळून धण्याचे पाणी प्यावे. यामुळे आरोग्यासंबंधित अनेक समस्या काम होतात. गॅस, सूज आणि अपचन या समस्यांपासून आराम मिळतो. वजन नियंत्रणात राहते: वाढलेले वजन कमी करण्यासाठी अनेक प्रयत्न केले जातात. पण अनेकदा वजन कमी होत नाही. अशावेळी तुम्ही धण्याचे पाणी पिऊ शकता. हे पाणी नियमित प्यायल्यास पोटावरील चरबी कमी होऊन तुम्ही स्लिम दिसाल. कोलेस्ट्रॉल नियंत्रणात राहतो: शरीरातील नसांमध्ये वाढलेले खराब कोलेस्ट्रॉल काढून टाकण्यासाठी रोजच्या आहारात धण्याचे पाणी प्यावे. या पाण्यात आढळून येणाऱ्या घटकांमुळे शरीरातील घाण कमी होऊन आरोग्य सुधारते. थायरॉईड नियंत्रण राहते: महिलांमध्ये मोठ्या प्रमाणावर थायरॉईडची समस्या दिसून येतो. शरीरात थायरॉईड वाढल्यानंतर मासिक पाळीमध्ये अडथळा निर्माण होणे, मान किंवा घसा सुजणे इत्यादी अनेक समस्या जाणवू लागतात. अनेकदा थायरॉईड झाल्यानंतर वजन वाढू लागते. त्यामुळे वाढलेले वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी कोथिंबिरीच्या बियांचे पाणी प्यावे. अशा पद्धतीने तयार करा कोथिंबिरीच्या बियांचे पाणी: पाणी तयार करण्यासाठी एक ग्लास पाणी बारीक करून घेतलेले धणे टाकून घ्या. त्यानंतर त्यात कोमट पाणी टाकून रात्रभर धणे पाण्यात भिजत ठेवा. भिजत ठेवलेल्या कोथिंबिरीच्या बियांचे पाणी सकाळी उठल्यानंतर प्या. यामुळे तुमची बिघडलेली पचनक्रिया सुधारेल.

# सकाळची सुरुवात करा हेल्दी नाश्त्याने, सोप्या पद्धतीमध्ये बनवा पनीर पॅनकेक

सकाळी उठल्यानंतर सगळ्यांचं हेल्दी आणि टेस्टी नाश्ता हवा असतो. अनेक लोक सकाळचा नाश्ता बाहेरून विकत आणतात. पण सतत बाहेरचे पदार्थ खाल्यामुळे आरोग्य बिघडण्याची शक्यता असते. त्यामुळे शक्यतो घरी बनवलेले ताजे अन्नपदार्थ खावेत, जे आरोग्यासाठीसुद्धा गुणकारी ठरतील. अनेकदा नाश्त्यासाठी नेमकं काय बनवावे? हा प्रश्न सर्वच महिलांना पडतो. अशावेळी महिलांना कमीत कमी वेळात तयार होणारा पदार्थ हवा असतो. अशावेळी तुम्ही नाश्त्यामध्ये पनीर पॅनकेक बनवू शकता. पनीर आरोग्यासाठी हेल्दी असल्यामुळे अनेक लोक पनीरचे सेवन करतात. लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं पनीर खूप आवडते. त्यामुळे कमीत कमी वेळात तयार होणारे पनीर पॅनकेक नक्की बनवून पहा. चला तर जाणून घेऊया पनीर पॅनकेक बनवण्याची सोपी कृती. साहित्य: पनीर मीठ साखर मेपल सिरप मैदा तेल बटर मध





कृती: पनीर पॅनकेक बनवण्यासाठी सर्वप्रथम पनीर स्वच्छ धुवून किसून घ्या. पनीर पासून पदार्थ तयार करताना पनीर नेहमी ताजे घ्यावे.

एका भांड्यात मैदा घेऊन त्यात चवीनुसार मीठ टाकून मिक्स करा. त्यानंतर त्यात साखर टाकून पुन्हा एकदा मिक्स करून घ्या.

तयार केलेल्या पिठामध्ये आवश्यकतेनुसार पाणी घालून जाडसर बॅटर तयार करून घ्या. यामध्ये जास्त पाणी घालू नये.

गॅसवर पॅन गरम करण्यासाठी ठेवा. पॅन गरम झाल्यानंतर त्यात तेल किंवा बटर टाकून गरम करून घ्या.

बटर गरम झाल्यानंतर तयार केलेल्या मिश्रणाचे छोटे छोटे पॅनकेक टाकून दोन्ही बाजूने भाजून घ्या.

सर्व्ह करताना वरून मेपल सिरप किंवा मध टाकून नाश्त्यासाठी लहान मुलाना आणि घरातील इतर व्यक्तींना द्या.

# गणपती बाप्पाच्या नैवेद्यासाठी काही मिनिटांमध्ये बनवा शेवयांची खीर, वाचा सोपी रेसिपी



संपूर्ण देशभरात गणपती बाप्पाचे मोठ्या उत्साहात आणि आनंदात आगमन झाले आहे. बाप्पाच्या आगमनामुळे संपूर्ण मुंबापुरी आनंदून गेली आहे. कोकण, मुंबई, पुण्यासह इतर ठिकणी गंपाश बाप्पाचे मोठ्या जलौषात आगमन झाले आहे. बाप्पाचे आगमन झाल्यानंतर बाप्पाची विधिवत मनोभावे पूजा करून गणपतीला गोड पदार्थांचा नैवेद्य दाखवला जातो. त्यानंतर बाप्पाला दाखवलेला नैवेद्य सगळ्यांना प्रसाद म्हणून वाटला जातो. गणपती आल्यानंतर सगळीकडे ११ दिवस मोठा आनंद आणि उत्साह निर्माण होतो. त्यामुळे यंदाच्या वर्षी बाप्पाच्या नैवेद्यासाठी तुम्हाला जर काही नवीन पदार्थ बनवायचा असेल तर तुम्ही शेवयांची खीर बनवू शकता. शेवयांची खीर बनवण्यासाठी जास्त वेळ लागत नाही. तसेच घाईगडबीच्या वेळी कमीत कमी साहित्यामध्ये शेवयांची खीर तयार होते. तसेच ही खीर तुम्ही बाप्पाच्या प्रसादासाठी सुद्धा बनवू शकता.चला तगर जाणून घेऊया शेवयांची खीर बनवण्याची सोपी रेसिपी. साहित्य: शेवयांची खीर साखर दूध वेलची पावडर काजू बदाम तूप केशर मनुके कृती: शेवयांची खीर बनवण्यासाठी सर्वप्रथम कढईमध्ये तूप गरम करण्यासाठी ठेवा. तूप गरम झाल्यानंतर त्यात शेवया टाकून व्यवस्थित भाजून घ्या. दुसऱ्या बाजूला गॅसवर दूध उकळण्यासाठी ठेवा. दुधाला उकळी आल्यानंतर गरम दूध शेवयांमध्ये ओतून शेवया शिजवण्यासाठी ठेवा. पॅनमध्ये तूप टाकून पुन्हा एकदा काजू, बदाम, मनुके खमंग भाजून घ्या. शेवया शिजल्यानंतर त्यात तुमच्या आवडीनुसार साखर टाकून मिक्स करून घ्या. नंतर त्यात भाजून घेतलेले ड्रायफ्रूट आणि वेलची पावडर टाकून मिक्स करा. सगळ्यात शेवटी शेवयांच्या खीरमध्ये केशरच्या काड्या टाकून खीर मिक्स करून गॅस बंद करून घ्या. सर्व्ह करताना वरून काजू बदाम टाकून बाप्पाच्या नैवेद्यात ठेवा.

# वयाच्या चाळीशीमध्ये चेहऱ्यावर सुरकुत्या दिसतायत? मग करा 'या' लाल तेलाचा वापर, त्वचा दिसेल तरुण

वाढत्या वयासोबतच महिलांच्या शरीरात अनेक बदल दिसून येतात. बदलत्या जीवनशैलीमुळे वयाच्या तिशीमध्येच महिलांच्या चेहऱ्यावर सुरकुत्या, बारीक रेषा, पिगमेंटशेंन इत्यादी अनेक गोष्टी दिसून येतात. त्यामुळे योग्य ती जीवनशैली जगून आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. महिलांच्या शरीरात सातत्याने हार्मोनल असंतुलन होत असते, त्याचा सार्वधिक परिणाम महिलांच्या चेहऱ्यावर दिसून येतो. अनेक महिला सुंदर आणि चमकदार त्वचा मिळवण्यासाठी काहींना काही उपाय करत असतात. पण यामुळे अनेकदा त्वचा खराब होण्याची शक्यता असते. त्वचेला कोणतेही प्रॉडक्ट लावण्याआधी ते तुमच्या त्वचेला सूट होईल की नाही, प्रॉडक्ट बनवण्यासाठी कोणते घटक वापरले आहेत, हे सुद्धा व्यवस्थित तपासून पहावे. सुंदर चमकदार त्वचा मिळवण्यासाठी बाजारात मिळणारे महागडे आणि केमिकल युक्त प्रॉडक्ट वापरण्यापेक्षा घरगुरी पदार्थांचा वापर करावा. नैसर्गिक गोष्टी त्वचेवरील चमक कायम टिकवून ठेवतात. त्यामुळे तुम्ही तुमच्या स्किन केअर रुटीनमध्ये केशर तेलाचा वापर करू शकता. केशराचे तेल त्वचा आणि केसांना लावल्यामुळे अनेक गुणकारी फायदे होतात. हे आयुर्वेदिक तेल असून मागील अनेक वर्षांपासून या तेलाचा वापर केला जात आहे. कुंकुमादी या शब्दाचा अर्थ केशर तेल' असा होत असल्यामुळे अनेक लोक हे तेल वापरतात. केशरपासून टोनर, तेल, हेअर सिरम इत्यादी अनेक गोष्टी बनवल्या जातात. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला चेहऱ्यावरील सुरकुत्या घालवण्यासाठी केशर तेलाचा वापर कसा करावा, याबद्दल सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया. केशर तेल घरी बनवण्याची सोपी पद्धत: साहित्य: केशर दूध चंदन पावडर मंजिष्ठ पावडर खस पावडर बदाम तेल तिळाचे तेल कृती: केशर तेल बनवण्यासाठी सर्वप्रथम केशरच्या काड्या काहीवेळ दुधात भिजवून ठेवा. केशर दुधामध्ये अर्धा तास तरी भिजने आवश्यक आहे. त्यानंतर एका वाटीमध्ये चंदन, मंजिष्ठ, हळद आणि खस पावडर एकत्र मिक्स करून घ्या. मिक्स करून घेतलेल्या साहित्यामध्ये कोमट गरम केलेले तिळाचे तेल आणि बदामाचे तेल टाकून पुन्हा एकदा व्यवस्थित मिक्स करा. नंतर त्यात केशरचे दूध टाकून कढईमध्ये तयार केलेले सर्व मिश्रण टाकून काहीवेळ शिजवून घ्या. तेल व्यवस्थित शिजल्यानंतर गॅस बंद करून तेल थंड करा. तयार आहे केशरचे तेल. हे तेल नियमित त्वचा आणि केसांना लावल्यास अनेक फायदे होतील. केशरच्या तेलाचे फायदे: त्वचेवर आलेल्या सुरकुत्या, पिंपल्स आणि मुरुमांचे डाग घालवण्यासाठी केशर तेलाचा वापर करा. त्वचेसाठी हे तेल अतिशय प्रभावी आहे. केशर तेल लावल्यामुळे प्रामुख्याने हायपरपिग्मेंटेशन, डाग, मुरुम, मुरुम आणि वृद्धत्वाची चिन्हे कमी होण्यास मदत होईल. तसेच उन्हामुळे टॅन झालेला त्वचेचा रंग सुधारण्यासाठी केशर तेल नियमित वापरावे. त्वचेसोबतच केसांच्या वाढीसाठी सुद्धा तुम्ही केशर तेल वापरू शकता. तेल लावून हलक्या हाताने केसांना मालिश करा.





# घरात बुद्ध उत्सव का साजरा करावा?.सागर तायडे.

तुम्ही बौद्ध आहात काय?. तुम्ही स्वताला बौद्ध समजता पण आचरण कसे करता. बुद्धाच्या पाय पडून पुजा केली पाहिजे की प्रचांग प्रणाम?.किती लोकांना यातील फरक माहिती आहे.म्हणूनच आज मी आपल्या समोर घरात बुद्ध उत्सव का साजरा करावा हे सांगण्यासाठी लिहत आहे.घरात बसून बुद्ध उत्सव साजरा केला तर त्रिसरण,पंचशील यांचा अर्थ समजून घेता येईल.आणि त्यांचे आचरण घरातुन सुरू झाले तर तुम्ही कुठेही गेला तर ते संस्कार आपण विसरुच शकत नाही. हे संस्कार नसल्यामुळेच बुद्ध विहारे परिवर्तनांचे केंद्र झाले नाही. कारण विहिरीत नाही तर पोहऱ्यात कुठून येणार. दुःख आहे,त्याला कारण आहे.त्यांचे निवारण करण्यासाठी उपाय सुद्धा आहे.त्यासाठी बुध्दांनी दाखविलेल्या मानवमुक्तीच्या मार्गाने आपणांस जावे लागेल. सात दिवस घरात बुद्ध उत्सव साजरा केला तर अनेक समस्यांचे निवारण करता येते. कसे ते समजून घेणे महत्वाचे असते. यानिमित्ताने मित्रमंडळी हितचिंतक नातलगांना आपल्या घरी बोलवा.त्यामुळे घरातील वातावरण पाहिल्यावर हमखास कुटुंबातील व्यक्तीची चौकशी केल्या शिवाय कोणी ही राहणार नाहीत.घरच्या भिंतीवर कोणाचे फोटो आहेत. त्यातून तुमचे आदर्श कोण हे प्रेरणास्थान कोण लगेच लक्षात येते.तुम्ही प्रत्येकक्षा कोण आहात आणि काय सांगता हे घरातील वातावरण स्पष्टपणे दाखवून देते.मग प्रश्न येतो मुलगा,मुलगी किती?. मुलामुलींचे शिक्षण,नोकरी आणि लग्न यांची माहिती विचारल्या शिवाय घरी आलेला माणूस शांतपणे जाऊच शकत नाही.हीच बुद्धांच्या विचारांची शक्ती आचरणातून दिसते.तीच सर्वश्रेष्ठ आचरण इतरांस प्रेरणादायी व लक्षवेधी ठरते. बुद्ध उत्सव घरात साजरा करणे निश्चितच हे एक लहान वाटणारे पण महान कार्य आहे. ह्यातून बौद्ध उपासक प्रेरणा घेऊन आपल्या घरी दररोज वंदना घेऊन आपल्या मुलांवर,नातूनातवांवर संस्कार करतील की आपण बौद्ध आहोत. बौद्धांच्या आचारसंहितेचे पालन केले पाहिजे.त्याने त्यांना धम्माचे संघांचे महत्व पाटल्या शिवाय राहणार नाही. जगातील एकशे चाळीस देशात सम्राट अशोक कालीन बुद्ध उत्सव घरात साजरा केला जातो.त्यामुळे त्या देशातील धम्म उपासकांची सर्वच क्षेत्रात प्रगती होत आहे. आपले आपल्या जिल्ह्यातील गांवचे काय?. बाबासाहेबांनी सांगितले होते खेडे सोडा,शहर गाठा.गावात लाचारीने मिळणारी भाकरी,आणि शहरातील स्वाभिमानाने मिळविलेली कष्टाची भाकरी फरक पडला की नाही.हे तुमच्या घरातील एकूण परिस्थिती आणि वातावरणा वरुण लक्षात येते. त्यात बदल का घडला नाही. याला कोण जबाबदार हे प्रथम आपल्या लक्षात आले तर बदल घडविता येतो.म्हणूनच संस्कार हे प्रथम घरात झाले पाहिजे. शाळा कॉलेज मध्ये फक्त शिक्षण भेटते.संस्कार नाही.हे प्रत्येक धर्माचे संस्कार वेगवेगळे आहेत.ते लहानपणा पासून करावे लागतात.

जगातील बुद्ध धम्माचे उपासक हेच आचरण करत आहे. पण ते आपणास कळत नाही,कोणी सांगत असेल तर त्यावर आपण विश्वास ठेवत नाही.वंदना घेत नाहीत. अनेक लोक बौद्ध तत्वज्ञानाचा लाभ घेतात पण बुद्धाला वंदन करत नाहीत.आपले तसे नाही.संपूर्ण विश्व सुखी व्हावे हे आपले उद्दिष्ट आहे.ज्यामुळे सर्व सुखी होतील.पण घरात आपण शुद्ध बुद्ध नसलो तर बाहेर आपली ओळख काय करून ठेवली यांचे आत्मचिंतन करण्यासाठी घरा घरात सम्राट अशोक कालीन बुद्ध उत्सव घरात साजरा केला पाहिजे.कोल्हापुच्या सिद्धार्थ नगर मधून आयु.देवदास बानकर संपादक दैनिक मुक्तनायक यांनी आठ वर्षापूर्वी सुरवात केली होती.गेल्या वर्षी तो घरा घरात बुद्ध उत्सव १८ जिल्ह्यात साजरा केला गेला.आता त्याचा जस जसा प्रचार व प्रचार होईल तस तसे धम्म उपासक उपासिका तो घरा घरात उत्सव साजरा करतील.सर्व धम्म उपासिकांनी घरात बुद्ध उत्सव का साजरा करावा?. यांची रूपरेषा दरवर्षी दैनिक मुक्तनायक संपादक देवदास बानकर एक महिना अगोदर दररोज दैनिकात अर्धापान जाहिरात जनजागृतीसाठी देऊन समजावून सांगत असतात.आपण ही तो सम्राट अशोक कालीन बुद्ध उत्सव घरात कसा साजरा करावा हे समजून घ्यावे आणि इतरांना सांगावे.तरच आपण जगातील बौद्धाशी आपले वैचारिक नातं सांगू शकतो. आपल्या देशाचे लाडके प्रधान मंत्री इथे देशात कसे वागतात हे आपण दररोज पाहतो. पण हेच प्रधानमंत्री परदेशात कोणत्याही देशात गेले तर काय सांगतात?. तथागताच्या जन्मभूमीतून आलो आहे. का सांगतात ते हे ?. गांभीर्याने विचार करावा आणि आचरण करावे.





***********

सागर रामभाऊ तायडे–
९९२०४०३८५९,
भांडुप,मुंबई.

# कोलेस्ट्रॉल, मधुमेह नियंत्रणात ठेवण्यासाठी गुणकारी ठरतील 'ही' पवित्र पाने, अशा पद्धतीने बनवा पाणी

प्रत्येक घरात तुळशीच्या झाडे हे असते. आयुर्वेदामध्ये तुळशीच्या झाडाला फार महत्व आहे. तुळशीच्या पानांचा वापर धार्मिक गोष्टींमध्ये आणि इतर कामांसाठी केला जातो. पूजा करताना देवा पुढे तुळशीचे पान वाहिले जाते. भारतीय संस्कृतीमध्ये तुळशी ही महत्वाची वनस्पती आहे. तुळशीच्या पानांचा वापर जितक्या प्रमाणात पूजेसाठी केला जातो तेवढाच वापर आयुर्वेदातसुद्धा केला जातो. तुळशीच्या पानांचे सेवन केल्यामुळे शरीरातील अनेक गंभीर आजार नाहीसे होतात. शरीरातील इतर समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी तुळशीच्या पानांचे सेवन करणे. तसेच तुम्ही तुळशीच्या पानांपासून बनवलेले पाणी सुद्धा पिऊ शकता. त्यामुळेच आज आम्ही तुम्हाला तुळशीच्या पानांचे पाणी प्यायल्यामुळे आरोग्याला नेमके काय फायदे होतात? तसेच तुळशीच्या पानांचे पाणी कसे वापरावे? याबद्दल सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया.तुळशीचे पाणी कसे तयार करावे?तुळशीचे पाणी बनवण्यासाठी सोपे आहे. सर्वप्रथम टोपामध्ये पाणी घेऊन त्यात ७ ते ८ तुळशीची पाने टाकावी. पाने टाकून झाल्यानंतर पाण्याला उकळी आल्यावर गॅस बंद करून घ्या. एक ग्लास पाणी अर्धा ग्लास झाल्यानंतर पाणी बंद करावे. तयार केलेले पाणी सकाळी उठल्यानंतर रिकाम्या पोटी प्यावे. यामुळे शरीराला अनेक फायदे होतील. शरीरात कमी झालेली रोगप्रतिकारशक्ती सुधारण्यासाठी तुळशीचे पाणी प्रभावी आहे.तुळशीच्या पाण्याचे आरोग्याला होणारे फायदे:रोगप्रतिकारशक्ती वाढते: पावसाळ्यातील आजारांमुळे आणि इतर काही कारणांमुळे कमी झालेली रोगप्रतिकारशक्ती पुन्हा वाढण्यासाठी रोजच्या आहारात तुळशीच्या पानांचे सेवन करावे.

# वीरशैव लिंगायत सन्मान यात्रातून सामाजिक मंथन घडेल - खा.अजित गोपछडे बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात सन्मान सोहळा



लातूर/प्रतिनिधी: लिंगायत समाज हा सुशिक्षित,पुढारलेला आणि उद्योगी समाज आहे.सामाजिक तत्वे पाळून सर्वांशी सलोख्याने वागणारा हा समाज आहे.आता सामाजिक, राजकीय,शैक्षणिक व सांस्कृतिक बदल घडत असून या संदर्भात विचारांचे मंथन करण्यासाठीच वीरशैव लिंगायत सन्मान यात्रा सुरू केली असल्याचे मत खा.डॉ.अजित गोपछडे यांनी व्यक्त केले. गुरुवारी (दि.५) शिवलिंग शिवाचार्य महाराजांच्या समाधी स्थळावरून सुरु झालेली वीरशैव लिंगायत समाज सन्मान यात्रा शुक्रवारी लातूर शहरात दाखल झाली.या दरम्यान बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात संस्थेच्या संचालक मंडळाच्या सन्मान सोहळ्यात खा. गोपछडे बोलत होते. यात्रेच्या दुसऱ्या दिवशी शहरात लिंगायत समाजातील नामांकित व्यक्ती,संस्था यांचा त्यांनी सन्मान केला.

लिंगायत समाजातील लोकांनी एकतर्फी संवाद न करता सर्वांना सोबत घेऊन संवाद केला पाहिजे. सर्व समावेशक विचारमंथन करण्यासाठीच ही सन्मान यात्रा आहे.समाजातील गरिबी दूर करण्यासाठी, अडीअडचणी जाणून घेण्यासाठी आपण समाजातील संवाद साधत आहोत.यात्रेदरम्यान समाजातील सर्व घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आपण चार मागण्या करणार आहोत. त्यात महात्मा बसवेश्वर विकास महामंडळासाठी १ हजार कोटींचा निधी, लिंगायत समाजातील गोरगरीब विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी निवासी वसतिगृह निर्माण करणे,लिंगायत समाजातील ५७ पोटजातींमध्ये भेदभाव न करता सरसकट ओबीसी मध्ये समावेश करणे व शिवलिंग शिवाचार्य महाराज (राजूर)अहमदपूर यांना भारतरत्न पुरस्कार देणे याचा यात समावेश आहे.

मला देवेंद्र फडणीस आणि नरेंद्र मोदी यांनी ताकद दिली आहे. त्यांच्याच आशीर्वादाने अवघ्या दोन महिन्यात मी राज्यसभेत दहा भाषणे केली.त्यात महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले.मी उच्चशिक्षित आहे.बदलत्या काळात संशोधन करण्यासाठी अभियंत्यांनी पुढे यावे.जे सहकार्य लागेल ते करायला मी तयार आहे,असेही ते म्हणाले.

डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनीही विचार मांडले.यावेळी संस्थेचे अध्यक्ष,सचिव व संचालक मंडळाचा सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाची प्रस्तावना बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य सुरेश हल्लाळे यांनी केली. यावेळी संस्था अध्यक्ष आदिनाथ सांगवे,सचिव माधवराव पाटील टाकळीकर ,राजेश्वर बुके, काशिनाथ साखरे, बसवराव येरटे,बाबुराव खरबुडे,जी.एम.धाराशिवे, उपप्राचार्य संजय गवळी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## पंजाब येथील तिहेरी हत्याकांडातील आरोपींना समृद्धी महामार्गावर पकडले



छत्रपती संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगरच्या पोलिसांनी आज सकाळी एक धाडसी मोहीम राबवत फिरोजपूर पंजाब येथील तिहेरी हत्याकांडात सहभागी असलेल्या सात खतरनाक आरोपींना समृद्धी महामार्गावर कारवाई करत ताब्यात घेतले. अवघ्या काही दिवसांवर लग्न असलेल्या तरुणी आणि इतर दोघांची हत्या करून आरोपींनी पंजाबमधून पलायन केले होते. पहाटे ३ वाजता पंजाब पोलिसांच्या संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कृती दल (एजीटीएफ ॲण्टी गँगस्टर टास्क फोर्स) अतिरिक्त महासंचालक प्रमोद बान यांनी पोलिस आयुक्त प्रविण पवार यांना हत्याकांडातील सहा आरोपी नांदेड येथून समृद्धी महामार्गावरुन मुंबईकडे जात असल्याची माहिती दिली. आरोपींबाबत माहिती मिळताच छत्रपती संभाजीनगर गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संदीप गुरमे, सिडको ठाण्याचे पोलिस निरीक्षक गजानन कल्याणकर यांच्या नेतृत्वाखालील १० अधिकारी आणि ४० कर्मचा–यांची टीम बुलेटप्रुफ जॅकेटसह सज्ज झाली. आरोपी शस्त्रधारी असतानाही दक्ष पोलिसांनी समृद्धी महामार्गावर सापळा रचला. सकाळी ५. ४५ मिनिटांनी धाडसी कारवाई करत भरधाव वेगात कारमधून(एमएच २६ एसी ५५९९) जाणा–या पंजाब येथील सहाही आरोपींच्या पोलिसांनी शिताफीने मुसक्या आवळल्या.

## माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचा मातोळा ग्रामस्थातर्फे सत्कार



लातूर : प्रतिनिधी राज्याचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांना नुकताच पुणे येथील डेक्कन टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन पुणे इंडिया यांच्या वतीने देण्यात येणारा २०२४ चा अत्यंत मानाचा प्रतिष्ठित साखर उद्योग गौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. त्याबद्दल औसा तालुक्यातील मातोळा येथील ग्रामस्थांनी गणेश चतुर्थी दिवशी शनिवारी सकाळी आशियाना बंगल्यावर माजी मंत्री दिलीपरावजी देशमुख यांचा गणरायाची मूर्ती शाल व श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन मारुती महाराज साखर कारखान्याचे अध्यक्ष शामराव भोसले व ग्रामस्थ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील, लातूर जिल्हा बँकेचे व्हॉईस चेअरमन ॲड. प्रमोद जाधव, जिल्हा कॉंग्रेसचे समन्वयक सचिन दाताळ, मातोळा तंटामुक्तीचे अध्यक्ष अण्णासाहेब भोसले, औसा बाजार समितीचे माजी सभापती राजेंद्र भोसले, दत्तात्रय भोसले, संतोष आनंदगावकर, विजय भोसले, शरद भोसले, रमेश कदम, बबन आनंदगावकर, प्रताप भोसले, नेताजी भोसले, काकासाहेब भोसले बाळासाहेब भोसले, अजित भोसले, माजी सरपंच शेषराव गायकवाड आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## बीयांड व्हीजन फाउंडेशन द्वारा मराठवाडा दिव्यांग विशेष शिक्षक सन्मान सोहळ्याचे आयोजन



लातूर :- बीयांड व्हीजन फाउंडेशन फाउंडेशन ही संस्था सर्व प्रकारच्या दिव्यांग व्यक्तीच्या शिक्षण, प्रशिक्षण, रोजगार, स्वयंरोजगार, मनोरंजन, साहित्य, क्रीडा तसेच सांस्कृतिक क्षेत्रात त्यांचे कौशल्य विकसनार्थ स्थापित एक नोंदणीकृत सेवाभावी सामाजिक संस्था असून सदर उद्देश पूर्तीसाठी संस्था राज्यभरातील विविध उपक्रम राबवत आहे. दि. ०५ सप्टेंबर हा दिवस राष्ट्रीयस्तरावर शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून रविवार दि. ०८ सप्टेंबर २०२४ रोजी बीयांड व्हीजन फाउंडेशन, लायन्स क्लब, लातूर आणि श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने येथील एमसीव्हीसी सभागृहामध्ये स. ११ वा. आपल्या अपंगत्वावर मात करून शिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्राच्या निर्मितीत आपले उल्लेखनीय योगदान देणाऱ्या दिव्यांग विशेष शिक्षकांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या सन्मान सोहळ्यात मराठवाड्यातील लातूर, नांदेड, बीड, धाराशिव, परभणी आणि हिंगोली या जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांना विशेष अध्यापन करणाऱ्या दिव्यांग विषय शिक्षकांना प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह व भेट वस्तु देऊन गौरव करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे हे उपस्थित राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, विभागीय शिक्षण उपसंचालक डॉ. गणपत मोरे, प्रादेशिक उपायुक्त, अविनाश देवसटवार, समाज कल्याण विभाग, लातूर आणि महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांची उपस्थिती लाभणार आहेत. या कार्यक्रमाला मराठवाड्यातील सर्व दिव्यांग विषय शिक्षकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन अध्यक्ष डॉ. माधव गोरे, सचिव संदीप चोपडे, उपाध्यक्ष प्रा. सुशील शेळके, मीरा चोपडे, सहसचिव प्रशांत गवंडगावे आणि सर्व सदस्यांनी केले आहे.


## बोईंगच्या ‘स्टारलायनर’चे सुरक्षित लँडिंग

वॉशिंग्टन : वृत्तसंस्था सुनीता विलियम्स आणि बुच विल्मोर यांना आंतरराष्ट्रीय अवकाश तळावर घेऊन गेलेल्या ‘स्टारलायनर’ स्पेसक्राफ्टमुळे बोईंगची प्रतिष्ठा पणाला लागली होती. स्टारलायनर ५ जूनला सुनीता विलियम्स आणि बुच विल्मोर यांना आंतरराष्ट्रीय स्पेस स्टेशनवर घेऊन गेलं. १३ जूनला दोन्ही अंतराळवीर पृथ्वीवर परतणार होते. पण थ्रस्टरमध्ये बिघाड आणि हेलियम लीकेजमुळे ठरलेल्या वेळेत हे यान पृथ्वीवर परतू शकले नाही. ८ दिवसाच्या टेस्ट मिशनवर गेलेले विलियम्स आणि विल्मोर आता दीर्घकाळानंतर पृथ्वीवर परतणार आहेत. दोघेही अंतराळवीर आता नासाच्या क्रू९ मिशनचा भाग आहेत. नासाने दिलेल्या माहितीनुसार, स्टारलायनर भारतीय वेळेनुसार सकाळी ३.३० वाजता स्पेस स्टेशनपासून वेगळं झालं. ९ वाजून ३२ मिनिटांनी अमेरिकेच्या न्यू मेक्सिको व्हाइट सँड स्पेस हॉर्बरमध्ये लँड झाले. हा वाळवंटी प्रदेश आहे. स्टारलाइनरच्या लँडिंग वीडियोमध्ये स्पष्टपणे दिसते की, लँड होण्याआधी स्पेसक्राफ्टचे ३ पॅराशूट ओपन झाले. त्याद्वारे पृथ्वीवर सुरक्षित लँडिंग झाले.

स्टारलायनरने ८.५८ मिनिटांनी डीऑर्बिट बर्न पूर्ण केलं. या बर्ननंतर जमिनीवर लँड होण्यासाठी ४४ मिनिट लागली. लँडिग करताना वातावरणात हीटशिल्ड एक्टिव होतं. त्यानंतर ड्रोग पॅराशूट डिप्लॉय करण्यात आले. तीन पॅराशूट तैनात झाल्यानंतर रोटेशन हँडल रिलीज करण्यात आलं. जेणेकरुन स्पेसक्राफ्टने गोल फिरणं बंद करावं. सरळ, एका स्थितीत लँड केलं पाहिजे. खालच्या बाजूला असलेलं हिट शील्ड काढण्यात आल. त्यानंतर एयरबॅग ओपन झाले. त्यानंतर रिकवरी टीम येऊन स्पेसक्राफ्टला रिकव्हर केले.

# खरोसा सरपंचाचा महाप्रताप अधिकाऱ्यांच्या संगनमताने , दुबईत,पुणे वास्तव्यास असलेल्या मजुराकडून केले रस्त्याचे काम

## रोजगार हमी योजनेअंतर्गत गाव रस्ते कामात ऐंशी लाख रुपयांचा भ्रष्टाचार, ग्रामस्थांकडून चौकशीची मागणी..!













लातूर / प्रतिनिधी :- औसा तालुक्यातील खरोसा ग्रामपंचायत अंतर्गत गावात करण्यात आलेल्या रस्ते कामात तब्बल ८० लाख रुपयांचा भ्रष्टाचार केला असून आतापर्यंत ३७ लाख रुपये या महाशयांनी उचलले असल्याचे सांगितले जात आहे,सरपंच ग्रामसेवक आणि इंजिनियर यांच्या संगनमताने दुबई पुणे येथे कामास असलेल्या मजुरांची बोगस नावे टाकून लाखो रुपयाचा भ्रष्टाचार केल्याचे उघडकिस आल्याने एकच खळबळ उडाली आहे.दरम्यान या भ्रष्ट कामाची तात्काळ चौकशी करावी असे मागणी खरोसा ग्रामस्थांनी केली असून आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की खरोसा येथील ग्रामस्थ आणि सामाजिक कार्यकर्ते दिगंबर जाधव यांनी संबंधित विभागाला दिनांक ५ सप्टेंबर २०२४ रोजी लेखी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की औसा तालुक्यातील खरोसा ग्रामपंचायत या अंतर्गत गावात सात किलोमीटर रस्त्याचे काम रोजगार हमी योजनेअंतर्गत करण्यासाठी तब्बल ८४ लाख रुपये निधी झाला आहे. विशेष म्हणजे एका किलोमीटरला बारा लाख रुपये याप्रमाणे सात किलोमीटर रस्त्याचे काम करण्यात येणार होते परंतु सरपंच महाशय आणि ग्रामसेवक यांनी संबंधित अधिकारी इंजिनियर यांच्याशी संगणमत करून डांबरीकरण व सिमेंटकरण करण्याऐवजी केवळ गावाशेजारी असलेल्या डोंगराचे मुरूम रस्त्यावर टाकून अवघ्या चार लाखात रस्ते काम गुंडाळले आहे आणि तब्बल ८० लाख रुपयाचा भ्रष्टाचार केला आहे विशेष म्हणजे हे सर्व काम मजुराद्वारे करून घ्यायचे होते या कामावर त्यांनी दाखवलेले मजूर आज रोजी त्यापैकी १७ दुबई येथे तर काहीजण पुणे शहरात कामास आहेत असे असतानाही त्यांचे बोगस नावे लाखो दाखवून लाखो रुपयाचा भ्रष्टाचार केला आहे हे सर्व काम जेसीबी मशीनद्वारे करून प्रत्यक्ष काम करणाऱ्या मजुरांच्या पोटावर मात्र यांनी पाय दिला असून केवळ चार लाखांमध्ये शहरातील सात किलोमीटर चे रस्ते गुंडाळे आहे. तरी या सर्व कामाचे तात्काळ चौकशी करून सरपंच ग्रामसेवक आणि संबंधित इंजिनियर यांच्यावर तात्काळ गुन्हे दाखल करावे अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा दिगंबर जाधव यांच्यासह खरोसा गावच्या ग्रामस्थांनी दिला आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE